## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र. ५१/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ जानेवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाअधिकारी
(मुंबई, मुंबईउपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार,अकोला,
वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया वगळून)

विषय :- २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुका-२०१७,
उमेदवाराच्या शपथपत्रातील माहिती व व्हिडीओ बाईटस् यास प्रसिध्दी देणेबाबत.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. २ जानेवारी, २०१७ चे पत्र.

महोदय,

आयोगाच्या संदर्भांकीत दि. २/१/२०१७ च्या पत्रान्वये राज्यातील २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वतयारीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त सूचनांमधील मुद्दा क्र. १४ (२) व १४ (३) पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रातील माहितीच्या गोषवाऱ्यास वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रसिध्दी देणे. | जिल्हा परिषदेच्या निवडणुक विभागातील उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत दिलेल्या शपथपत्राचा संगणकीय प्रणालीमधून प्राप्त होणारा गोषवारा सोबत जोडलेल्या नमुन्यात मतदानापूर्वी किमान एका वृत्तपत्रात प्रसिध्द करणे ( शक्यतो) |
| २ | नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रातील माहितीचा गोषवारा मतदान केंद्राबाहेर फ्लेक्सच्या स्वरुपात लावणे. | सर्व जिल्हा परिषदा व पंचायत समितीतील अनुक्रमे निवडणुक विभाग व निर्वाचक गणातील उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत दिलेल्या शपथपत्राचा संगणकीय प्रणालीमधून प्राप्त होणारा गोषवारा सोबत जोडलेल्या नमुन्यात मतदान केंद्राबाहेर मतदारांना |

C:\Users\...\Desktop\...

| | | |
|---|---|---|
| | | स्पष्टपणे वाचता येईल अशा आकाराच्या फ्लेक्सच्या स्वरुपात लावणे अनिवार्य. |
| ३ | उमेदवारांचे व्हिडीओ बाईटस् | अंतिमतः निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या पूर्वसंमतीने त्यांच्याबद्दलची माहिती त्यांच्याच शब्दात सांगणारे २/३ मिनिटांचे व्हिडीओ बाईटस् स्वयंसेवी संस्था घेऊ शकतील व त्या त्यांच्या संकेतस्थळावर ठेवू शकतील. सदर व्हिडीओ बाईटस् स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येऊ नयेत. |

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार.

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस २०१६/प्र.क्र.५१/का.७. दिनांक २३/०१/२०१७ सोबतचे सहपत्र

# परिशिष्ट - १

## जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०१७

## निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीचा गोषवारा

निवडणूक विभाग/निर्वाचक गण क्र. व नाव *

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता (कमाल) | मालमत्ता जंगम एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत: उमेदवार, त्याची पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | मालमत्ता स्थावर एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत: उमेदवार, त्याची पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | दायित्वे/थकीत रकमा (रु.लाखात) | उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणाची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

Disclaimer (अस्वीकरण)

१) सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१ (युनियन ऑफ इंडिया वि. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक रिफॉर्म व इतर) मधील दि.२ मे, २००२ च्या न्यायालयीन निर्णयाच्या आधारे

२) वरील गोषवारा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्रामधील दिलेल्या माहितीच्याआधारे देण्यात आला आहे.

३) उमेदवारांच्या मूळ शपथपत्राची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनाफलकावर / संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रातील माहिती चुकीची आहे असे प्रतिस्पर्धी उमेदवारास वाटत असल्यास त्यास त्याबाबत प्रतीशपथपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करता येते.

*सदरचा गोषवारा हा निवडणूक विभाग व त्यामधील निर्वाचक गणासाठी स्वतंत्ररित्या काढण्यात येईल व त्या त्या निर्वाचक गणाच्या संबंधित मतदान केंद्रावर लावण्यात येईल. उपरोक्त उमेदवारांचा क्रम हा मतपत्रिकेवरील क्रमानुसार असावा.

* सदरचा गोषवारा हा मतदारांना सहज वाचता येईल अशा आकाराच्या फ्लेक्स मध्ये मतदान केंद्रावर प्रसिध्द करावयाचा आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी

-------- जिल्हा परिषद / पंचायत समिती

---- निवडणूक विभाग/निर्वाचक गण